**राजाराम माने, प्रशासकीय सदस्य, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण**
**पुणे खंडपीठ पुणे यांचेसमोरील कामकाज.**

---------

Rev. Appli. No. NS/I/१/२०२०

१) श्रीमती शारदा श्रीमंत गाढवे / देशमुख ) अर्जदार
२) श्री. गणेश श्रीमंत गाढवे / देशमुख )
अ.क्र.१ व २ रा. नांदगाव, ता.जि.सातारा ४१५ १०७ )
३) शर्मिला श्रीमंत गाढवे / देशमुख )
लग्नानंतरचे नाव सौ. शर्मिला निवास रणनवरे )
रा. बोधे, तालुका माण, जिल्हा सातारा ४१५ ५०८ )

विरुध्द

**शहाजी चांगदेव भोसले (म.वा.)** ) जाब देणार
१) श्री. शहाजी चांगदेव भोसले )
२) श्री. हिंदुराव चांगदेव भोसले )
अ.क्र.१ व २ रा. पेरले, ता. कराड, जि. सातारा ४१५ १०९ )
३) सौ. अरुणा सदाशिव मोहिते )
रा. बाजार बेलवडे, ता. कराड, जि. सातारा ४१५ १२४ )
४) सौ. प्रभावती युवराव धुमाळ )
रा. सोनके, तालुका कोरेगाव, जि. सातारा ४१५ ५०१ )
५) सौ. कांचन दिपक मोहिते )
रा. तळबीड, ता. कराड, जि. सातरा ४१५ १२४ )
हणमंत निळोबा गाढवे / देशमुख (म.वा.) )
६) श्रीमती शोभा हणमंत गाढवे / देशमुख )
७) श्री. अभिजीत हणमंत गाढवे / देशमुख )
८) श्री. अविनाश हणमंत गाढवे / देशमुख )
अ.क्र.६ ते ८ नांदगाव, ता.जि. सातारा ४१५ १०७ )

अर्जदार यांचे विधिज्ञ ॲड देशमुख

## न्यायनिर्णय

फेरचौकशी अर्जदार यांनी सदरचा पुनर्निरीक्षण अर्ज उपविभागीय अधिकारी सातारा उपविभाग सातारा यांचेकडील आदेश क्रमांक टेनन्सी/अपिल/१७/२०१८ निर्णय दिनांक ३१/८/२०१९ वर नाराज होऊन दाखल केलेला आहे. सदर फेरचौकशी अर्जाची प्रथम सुनावणी दिनांक २५/२/२०२० रोजी सुरु झाली. जाब देणार यांना नोटीस देऊन सुध्दा पुढील तारखांस वारंवार गैरहजर असल्याचे आढळुन

येते. सदर प्रकरणी अंतिम सुनावणी ही दिनांक १७/२/२०२२ रोजी होऊन फेरचौकशी अर्जदार यांनी त्यांचे लेखी म्हणणे दाखल केलेले आहे.

प्रकरणाची थोडक्यात हकीकत पुढीलप्रमाणे आहे. उपविभागीय अधिकारी यांचेकडे दाखल झालेले अपील क्रमांक १७/२०१८ हे तहसिलदार सातारा यांचेकडील क्रमांक टेनन्सी/फेरचौकशी/एसआर/१/२०११ मध्ये दिनांक २८/१२/२०१७ रोजीच्या आदेशावर नाराज होऊन दाखल झालेले आहे. मूळ प्रकरण तहसिलदार यांचेकडील आदेश क्रमांक ५४/२००४ मध्ये निकाल होऊन वाद जमीन मौजे नांदगाव येथील गट क्रमांक ५९९ क्षेत्र ३० आर या जमिनीत ७/१२ उताऱ्याचे इतर हक्कात सध्याचे वादी गाढवे यांचे पोकळीस्त असलेले नाव कमी करण्याचा आदेश दिनांक २३/३/२००९ रोजी दिला होता. त्यावर उपविभागीय अधिकारी यांचेकडे अपील होऊन त्याचा निर्णय टेनन्सी अपील क्रमांक २२/२००९ निर्णय दिनांक २३/९/२०१० नुसार झाला. अपील अंशत: मंजूर करुन काही मुद्यावर दावा फेरचौकशीकामी तहसिलदार यांचेकडे पाठविला होता. तहसिलदार यांनी अपील क्रमांक १/२०११ अन्वये निर्णय देऊन जाब देणार यांचा अर्ज नामंजूर करण्यात येऊन तहसिलदार सातारा यांचेकडील मूळ कुळकायदा केस क्रमांक ५४/२००४ निर्णय रद्द करुन जमिनीच्या ७/१२ चे इतर हक्कात संरक्षित कुळ म्हणून फेरचौकशी अर्जदार यांचे असलेले नाव कायम करण्याबाबत झालेला आदेश कायम केला.

सदर निर्णयावर उपविभागीय अधिकारी यांचेकडे झालेले अपील क्रमांक १७/२००८ प्रमाणे जमीनमालक श्री. भोसले यांचे अपील मान्य करण्यात आले व इतर हक्कातील नावे पोकळीस्त असलेबाबत कमी करण्याचे आदेश देण्यात आले. त्यावर सदरचा फेरचौकशी अर्ज दाखल झाला आहे. सदर प्रकरणातील अपिलार्थी यांनी त्यांचे लेखी म्हणणे दिनांक १७/२/२०२२ रोजी सादर केलेले असुन जाब देणार हे त्यांना वारंवार संधी देऊन सुध्दा गैरहजर आहेत. त्यामुळे फेरचौकशी अर्जदार यांचा लेखी युक्तिवाद व खालील कोर्टाची कागदपत्रे यांचे अवलोकन करुन अंतिम निर्णय घेण्याचे ठरविण्यात आले.

उपविभागीय अधिकारी यांनी दिलेल्या अपिलाचे निर्णयाचे अवलोकन करता उपविभागीय अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे विवेचन केले आहे. तहसिलदार तथा

शेतजमीन न्यायाधिकरण यांनी सदर प्रकरणी जमीन मालकी वहिवाटीत झालेले बदल हे महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख व नोंदवहया तयार करणे व सुस्थितीत ठेवणे १९७१ च्या तरतूदीप्रमाणे तहसिलदार यांनी निर्णय दिल्याशिवाय वहिवाटीत बदल करता येणार नाही. अशा प्रकारे चौकशी न होता तलाठी यांनी वहिवाटीत बदल केले हे चुकीचे आहे असे नमूद केले आहे. पुढे त्यांनी असेही म्हटले आहे की, सदर तरतुदींचा उल्लेख करुन तहसिलदार यांनी गल्लत केली आहे. तहसिलदार यांनी जमिनीमध्ये कुळाचा कब्जा आहे किंवा कसे याची पडताळणी न करता वाद जमिनीच्या इतर हक्कातील जाब देणार यांच्या कुळ नोंदी कायम करण्याचा आदेश दिला होता तो चुकीचा आहे म्हणून अपील मान्य केलेले आहे. तहसिलदार यांचा निर्णय व फेरचौकशी अर्जदार शारदा श्रीमंत गाढवे / देशमुख यांचे युक्तिवादाचे अवलोकन करता तहसिलदार यांनी दिलेला निर्णय कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ७०ब अन्वये दिलेला आहे. त्यामध्ये नोंदवहया तयार करणे व सुस्थितीत ठेवणे या नियमाचा उल्लेख असला तरी मुख्य मुद्दा वाद जमिनीमध्ये फेरचौकशी अर्जदार हे कृषकदिनी संरक्षित कुळ होते किंवा कसे हा आहे. त्यासाठी दिनांक १/४/१९५७ पूर्वीचा फेरफार व संरक्षित कुळ असण्यासाठी नमूद पात्रता हे कुळकायद्यातील तरतूदीनुसार नमूद आहे. त्याचे अवलोकन करुन व इतर पुरावे पाहुन तहसिलदार यांनी फेरचौकशी अर्जदार यांचे पूर्वजांची व त्यांचे वारस यांची नावे कायम ठेवण्याबाबत निर्णय दिलेला आहे. त्यामुळे उपविभागीय अधिकारी यांनी त्यांचे अपिलामध्ये खालील कोर्टाचे आदेश रद्द करण्याचा दिलेला निर्णय अर्थहीन ठरतो. तसेच, कृषकदिनी जर फेरचौकशी अर्जदार हे संरक्षित कुळ असतील तर ते पोकळीस्त असण्याचा प्रश्न उद्भवत नाही. त्यामुळे तहसिलदार यांचे आदेशामध्ये कोणताही फेरफार करण्याची आवश्यकता नाही व तहसिलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण यांनी या प्रकरणी बदल करणे अपेक्षित नाही. सबब पुढीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

**आ दे श**

१) पुनर्निरीक्षण अर्ज मान्य करण्यात येत आहे.

२) उपविभागीय अधिकारी सातारा, उपविभाग सातारा यांचेकडील आदेश क्रमांक टेनन्सी/अपिल/१७/२०१८ मध्ये दिनांक ३१/८/२०१९ रोजी पारित केलेला आदेश रद्द करण्यात येत आहे.

३) निकालपत्रांत दिलेल्या सूचनांप्रमाणे तहसिलदार यांचा निर्णय कायम करण्यात येत असुन, त्यांनी वाजवी मुदतीत पुढील कार्यवाही करण्यासाठी प्रकरण त्यांचेकडे पाठविण्यात येत आहे.

४) सदर निकालाची समज उभय पक्षकारांना देण्यात यावी.

५) खालील कोर्टाचे अभिलेख संबंधितांना परत करण्यात यावेत.

कौन्सिल हॉल, पुणे १
दिनांक : ०१/०४/२०२२

( राजाराम माने )
**प्रशासकीय सदस्य**
**महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण,**
**खंडपीठ पुणे.**